# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना विभाग)

जाहिरात क्र./४६१/पी.आर

दिनांक :-१९/०९/२०२४

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील विविध आरक्षणाखालील जागा तसेच विकास योजना / रस्त्याखालील जागा संपादन करण्याकरीता, शासकीय सेवेतील भुसंपादन अधिनियमांतर्गत जमिन अधिग्रहना बाबतचा अनुभवी अधिकाऱ्यांची नगर रचना विभागांतर्गत **"भुसंपादन सल्लागार"** या पदावर कंत्राटी तत्वावर, शासन निर्णय दि. १७ डिसेंबर, २०१६ व सुधारित शासन निर्णय दि. ०८/०९/२०२३ नुसार अनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदीनुसार करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याच्या कालावधीकरिता थेट मुलाखतीद्वारे तात्पुरती नियुक्ती करावयाची आहे.

उक्त कामाचा अनुभव असलेल्या व महाराष्ट्र शासन, महसुल विभागातील किंवा इतर शासकीय सेवेतील सेवानिवृत्त झालेल्या इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि.२०/०९/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता, अति. आयुक्त (सामान्य), सिव्हील लाईन्स, म.न.पा. नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ.क्र | पदाचे नाव | एकुण पद | वयोमर्यादा | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | **"भुसंपादन सल्लागार"** | ०१ | कमाल ६५ वर्षे | १) स्थापत्य अभियांत्रिकी पदवीधारक<br>२) शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेला असावा व नगर रचना मुल्य निर्धारण विभागातील किमान ५ वर्षाचा अनुभव.<br>३) शासकीय सेवेतुन भुसंपादन अधिनियमाअंतर्गत जमीन अधिग्रहण कामाचा अनुभव.<br>४) सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टिने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.<br>५) सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरूद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी. किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. |

वरील पदाकरिता इच्छूक उमेदावारांनी दि.२०/०९/२०२४ रोजी **सकाळी १०.३० ते १२.०० पर्यंतच्या दरम्यान** आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**अर्हता:-**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज अति. आयुक्त (सामान्य), नागपूर महानगरपालिका, सिव्हील लाईन, नागपूर यांचेकडे सादर करावेत.

३. वयोमर्यादा विचारात घेतांना दि.३०/०९/२०२४ ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

४. उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्राच्या छायाप्रती स्वसाक्षांकीत करून जोडाव्यात.

५. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा मानधनापोटी होणारा खर्च **नगर रचना विभागाच्या आस्थापनेवरून काढण्यात येईल.**

६. उमेदवारांनी अर्ज सादर करून अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील. व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

८. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

९. मासिक पारिश्रमिक-शासकीय/निमशासकीय/स्थानकि स्वराज्य संस्था या सारख्या संस्थेतून सेवा- सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेल्या मुळ निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रक्कमे ऐवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे, आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्ष) कायम राहील.

१०. सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

११. सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी, तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही गुन्हा दाखल नसावा व चारित्र्य चांगले असावे.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता/अटी/शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका, नागपूर

दिनांक :- / /२०२४

# अर्जाचा नमूना

१. पदाचे नाव :- ....................................................................................

२. अर्जदाराचे नांव :- ....................................................................................

३. पूर्ण पत्ता :- ....................................................................................

....................................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक :- ....................................................................................

ई-मेल आय डी :- ....................................................................................

४. जन्म दिनांक :- ....................................................................................

५. दि. / /२०२४ ला वय :- ....................................................................................

६. उमेदवारांचे जात व जातीचा संवर्ग :- ....................................................................................

७. सेवानिवृत्तीचे वेळी धारण
केलेले पद व कार्यालय :- ....................................................................................

८. शैक्षणिक पात्रता :- ....................................................................................

९. अ) सेवाकाळातील विभागीय
चौकशी सुरु आहे/ होती काय ?

ब) असल्यास विभागीय चौकशीत
शिक्षा झाली होती का ?

क) अर्जदारा विरुध्द कोणताही
गुन्हा दाखल आहे का ?

ड) गुन्हा दाखल असल्यास गुन्हाबाबत तपशील

९. अनुभवाचा तपशील :- ....................................................................................

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेल्या पदाचे नाव | कालावधी (पासून-पर्यंत) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

स्वाक्षरी